# निशाणी क्र. ४२ वरील आदेश

प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरूध्द् झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून कैफियत स्विकारणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे म्हणण्यानुसार, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना सदर दाव्याची प्रत मिळाले नंतर ते त्यांचे वकिलांमार्फत हजर झाले आहेत. तथापि सदर कामी त्यांना कैफियत देणेस विलंब झाला. सदरचा विलंब हा त्यांनी जाणूनबुजून केलेला नाही. सदर कामी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे लाड घराण्यातील सर्व संबंधितांचा विचार घेवून व आवश्यक ते कागदपत्र जमा करून कायदेशीर कैफियत देणे अत्यावश्यक होते. सदर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना सर्व ग्रामस्थांचा विचार घेवून म्हणणे घेवून कैफियत दाखल करणे शक्य झाले नाही. तसेच कैफियत दाखल करणेस कायदयाने नेमून दिलेला कालावधी असतो त्याबाबत माहिती नव्हती. त्यामुळे त्यांचे विरूध्द झालेला आदेश हा रद्दबातल करून दि. २२/०६/२०१८ रोजीचा आदेश रद्द करण्यात यावा. सदर कैफियत देणेस झालेला विलंब हा प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी जाणीवपूर्वक केलेला नसून त्यांचा तसा कोणताही इरादा नव्हता. सबब नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करून प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे विरूध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात येवून कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादींनी केली आहे.

२. वादींनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, कैफियत जाणीवपूर्वक मुदतीत दिलेली नाही. सबब अर्ज नामंजूर करावा अशी विनंती वादींनी केली आहे.

३. वादी आणि प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. सदर दावा अधिकारघोषणा व निरंतर मनाई करीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयाचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द् त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. शिवाय प्रस्तूत प्रतिवादींना कैफियत सादर करण्यास परवानगी दिल्यास वादींचे कसलेही नुकसान होईल असे मूळीच वाटत नाही. मात्र झालेल्या विलंबाबाबत प्रस्तूत प्रतिवादींनी वादींना खर्चाची रक्कम देणेबाबत आदेश पारीत करणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे:

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी रूपये ५००/— खर्चाची रक्कम जमा करावी, त्यापैकी त्यांनी रूपये २५०/— वादींना दयावेत व उर्वरित रक्कम सरकार जमा करावी.

३. प्रस्तुत प्रतिवादींनी वरील पूर्तता केल्यानंतर त्यांच्याविरूध्द् झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून कैफियत स्विकारणेत येते.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक : १८/०२/२०१९